# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## *Office of the Director Students' Welfare*

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)

**Dr.I.S. Mohurley, Director** **Email :** director.studentwelfaregug@ gmail.com web: www.gondwana.digitaluniversity.ac

Mobile: 7774027661, 9422893555 ishwarmohurley@gmail.com www.unigug.org


No / DSW-56/2015 Date. 09/06/2015

प्रति,

मा. प्राचार्य

गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोलीशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये

व विद्यापीठातील सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभाग.

**विषय :– विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना राबविण्याबाबत.**

**संदर्भ :– शासन पत्र क्र. उशिसं/२०१५/विमा योजना/मवि–१/३०५६ दि. ३० मार्च २०१५.**

महोदय/महोदया,

उपरोक्त संदर्भीय विषयांस अनुसरुन शासन निर्णय सोबत जोडला आहे, कृपया त्याचे अवलोकन करावे. अपघात विमा योजना राबविण्याबाबतचा शासन निर्णय २०११ मध्येच निर्गमित करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयाची आपल्या स्तरावर योग्य ती उचित कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

कळावे,

सोबत वरीलप्रमाणे.

डॉ. ईश्वर मोहुर्ले

संचालक विद्यार्थी कल्याण

विद्यार्थी कल्याण विभाग,

गोंडवाना विद्यापीठ गडचिरोली

प्रत माहीतीस्तव:

१. मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

२. मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

राज्यातील विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना (राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना ऐवजी **राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना)** राबविण्याबाबत

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन निर्णय क्रमांक-पीआरई- २०११/प्र.क्र. २४९/प्राशि-१,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई ४०० ०३२. दिनांक :- ११ जुलै, २०११

पहा:- १) शासन निर्णय,शालेय शिक्षण विभाग क्र. पीआरई २००१/ ५७७८३/२८९१/ प्राशि-१, दिनांक २० ऑगस्ट, २००३,
२)शासन परिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र. पीआरई-२००१/ ५७७८३/२८९१/प्राशि-१,दि.१ ऑक्टोबर २००३.
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २००८/ प्र.क्र.३८०/ २००८//प्राशि-१, दिनांक २८ जुलै २००९.
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २०१०/ प्र.क्र.४४७/प्राशि-१, दिनांक २५ ऑगस्ट २०१०
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २०१०/ प्र.क्र.४४७/प्राशि-१, दिनांक १ मार्च २०११.

**प्रस्तावना :-** विद्यार्थ्यांना अपघातामुळे पोहाचलेल्या क्षतीची काही प्रमाणात नुकसान भरपाई देण्याच्यादृष्टीने तसेच त्यांना सुरक्षा कवच देण्याकरिता राज्यातील इयत्ता १ ली पासून उच्च शिक्षण घेणा-या सर्व विद्यार्थ्यांना राजीव गाधी अपघात योजना (राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना) शासन निर्णय दि.२० ऑगस्ट, २००३ पासून राज्यामध्ये लागू करण्यात आली. यामध्ये शालेय शिक्षण विभाग, उच्च शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग, कृषी विभाग, सामाजिक न्याय विभाग, वैद्यकीय शिक्षण विभाग अशा सर्व प्रशासकीय विभागाच्या अखत्यारितील सर्व मान्यताप्राप्त शाळा, महाविद्यालये / शैक्षणिक संस्था यामधील विद्यार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. सन २००३ पासून सदर योजनेची अंमलबजावणी विमा कंपनीमार्फत करण्यात येत होती. त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांचे विम्याचे हप्ते एकत्रिततरित्या विमा कंपन्यांना एकाचवेळी अदा करण्यात येत होते.

२.     सदर विमा योजना दिवसातील २४ तासही लागू होती. म्हणजेच विद्यार्थ्याला कधीही अपघात झाला तरी तो विमा हप्त्यासाठी पात्र ठरतो. या योजनेंतर्गत शाळेच्या / संस्थेच्या स्तरावर किंवा विद्यार्थ्यांच्या स्तरावर किंवा अन्य कोणत्याही स्तरावर **विमा उतरविण्यासंदर्भात** कोणतेही प्रपत्र किंवा कागदपत्रे सादर करण्याची आवश्यकता नाही.

३.     या योजनेंतर्गत विद्यार्थ्यास अपघात झाल्यानंतर दाव्याची रक्कम अदा करावयाची कार्यपद्धती शासन परिपत्रक दि.१ ऑक्टोबर, २००३ मध्ये विशद केली आहे. तथापि, सन २००३ पासून या योजनेचा लाभ विद्यार्थ्यांना पुरेशा प्रमाणात झालेला नाही, त्यामुळे शासनाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. तसेच सन २०१०-११ या वर्षासाठी नॅशनल इन्शुरन्स कंपनी लि. मुंबई यांनी करार केलेला नाही. या विषयाच्या अनुषंगाने सन २०११ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये प्रश्नाच्या स्वरुपात ही बाब विधीमंडळामध्ये उपस्थित करण्यात आली आहे. त्यावेळी दि.२९/३/२०११ रोजी विधीमंडळात दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने या योजनेचा संपूर्ण आढावा घेऊन सदर योजना राज्यामध्ये सुधारित स्वरुपात राबविण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- राज्यामध्ये विमा कंपन्यांकडून राबविण्यात येणारी राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना याव्दारे बंद करण्यात येऊन ती आता शासनामार्फत **राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना** या स्वरुपात मंजूर करण्यात येत आहे. त्यामुळे शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २०१०/ प्र.क्र.४४७/प्राशि-१, दिनांक २५ ऑगस्ट २०१० आणि शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्र.पीआरई २०१०/ प्र.क्र.४४७/प्राशि-१, दिनांक १ मार्च २०११ अन्वये नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, मुंबई यांची सन २०१०-११ साठी केलेली नियुक्ती याव्दारे रद्द करण्यात येत आहे.

२.     मात्र, राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा विमा योजनेतील दि.२६ ऑगस्ट २०१० पूर्वीच्या प्रलंबित / अनिर्णीत/ विवादास्पद प्रकरणी अंतिम निर्णय त्या त्या काळातील संबंधीत विमा कंपन्यानी करारानुसार तात्काळ पूर्ण करावयाचे आहेत. त्याबाबत माहिती मिळविणे व न

मिळाल्यास योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्याची जबाबदारी शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राहील.

३. **राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजनेंतर्गत** यापूर्वी निर्गमित केलेले सर्व आदेश अधिक्रमित करुन सदर योजना **प्रायोगिक तत्वावर** सुधारितरित्या राबविण्यास या शासन या शासन निर्णयातील **विवरणपत्र "अ"** मध्ये दर्शविलेल्या तीन बाबींसाठी मान्यता देण्यात येत आहे. मात्र **या योजनेमध्ये समाविष्ट नसणा-या बाबी खालीलप्रमाणे आहेत.-**

१) आत्महत्येचा प्रयत्न करणे,

२) आत्महत्या किंवा जाणीवपूर्वक स्वत:ला जखमी करुन घेणे,

३) गुन्ह्याच्या उद्देशाने कायद्याचे उल्लंघन करतांना झालेला अपघात,

४) अमली पदार्थांच्या अंमलाखाली असतांना झालेला अपघात,

५) नैसर्गिक मृत्यू,

६) मोटार शर्यतीतील अपघात.

त्यानुसार **राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत** व दि. २७ ऑगस्ट, २०१० पासून घडलेल्या दाव्यांबाबत तसेच नव्याने २६ ऑगस्ट २०१२ पर्यंत येणा-या दाव्यांचा समावेश असेल.

४. या योजनेतील दावे निकाली काढण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात येत आहे :--

| | | |
|---|---|---|
| १) | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| २) | मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद) | सदस्य |
| ३) | तहसिलदार | सदस्य |
| ३) | शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | सदस्य |
| ४) | शिक्षणाधिकारी (प्राथमिक) | सदस्य-सचिव |

६. **<u>योजनेची कार्यपद्धती व संबंधितांची कर्तव्ये व जबाबदा-या</u>** १) अर्जदार - अ) लाभार्थ्यांने <u>विहित नमुन्यात</u> **(विवरणपत्र - क** )दाव्यासाठी ३ प्रतीत अर्ज करावा. अर्जासोबत या शासन निर्णयातील **प्रपत्र "ब"** मध्ये नमूद केलेली आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

२) अर्जावर संबंधित मुख्याध्यापक व शाळा/ महाविद्यालय/ शैक्षणिक संस्थांचे प्राधिकारी यांनी त्यांच्या शिफारशीसह व सही शिक्यानिशी अर्जाची एक प्रत संबंधित तहसिलदार व दूसरी प्रत संबंधीत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद यांच्याकडे १५ दिवसात पाठवावेत.

३) या योजनेंतर्गत प्राप्त अर्जांची संबंधित तहसिलदारांनी ३० दिवसात छाननी करुन आवश्यक त्या शिफारशींसह जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीपुढे ठेवण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) तथा सदस्य सचिव यांच्याकडे सादर करावेत.

४) संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी प्राप्त दाव्यांची माहिती तहसिलदारांच्या शिफारशीसह ३० दिवसांच्या आत समितीपुढे सादर करुन निकाली काढावीत.

५) सदर योजनेच्या प्रयोजनार्थ क्षेत्रीय स्तरावरील शाळा/महाविद्यालय/शैक्षणिक संस्था यांना **दावा प्रस्ताव सादरकर्ता प्राधिकारी म्हणून घोषित** करण्यात येत आहे.

६) समितीची बैठक शक्यतो दर महिन्यास लोकशाही दिनी किंवा दर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात घेण्यात यावी.

७) समितीने मान्य केलेल्या दाव्यांची रक्कम शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांच्यामार्फतच लाभार्थीस शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत /संस्थेच्या प्राचार्यामार्फत एकाच हप्त्यात (one time payment ) **धनादेशाद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात ७ दिवसात जमा करावी. यासाठी समितीचे सदस्य सचिव म्हणून शिक्षणाधिकारी ( प्राथमिक) जिल्हा परिषदा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.**

**८) या योजनेसाठी संबंधीत जिल्ह्याचे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.**

९) समितीने दावा नाकारलेल्या प्रकरणात समितीने निर्णय घेतल्यादिनांकापासून १५ दिवसात कारणांसह संबंधित मुख्याध्यापक /संस्थेचे प्राचार्य यांना लेखी कळवावे.

१०) या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांचे अपघातामध्ये निधन झाल्यास त्याच्या कुटुंबियास सानुग्रहाची रक्कम पुढील प्राथम्यक्रमानुसार अदा करावी.

अ) विद्यार्थ्याची आई,

ब) विद्यार्थ्याची आई हयात नसल्यास वडील,

क) विद्यार्थ्याची आई-वडील हयात नसल्यास, १८ वर्षावरील भाऊ किंवा बहीण किंवा पालक,

११) तसेच यासंदर्भात काही तक्रारी प्राप्त झाल्यास, छाननीअंती सदर तक्रारींचे निवारण करावे. तसेच वरील समितीने जिल्ह्यातील प्रकरणांचा आढावा घ्यावा. प्रलंबित / अनिर्णीत/ विवादास्पद प्रकरणी अंतिम निर्णय घेण्यात यावा व संबधितांस कळविण्यात यावा.

१२) शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषदा यांनी दरमहा निकाली निघालेल्या दाव्यांची यादी संबंधीत शिक्षण उपसंचालक व शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावी.

८. सदर सुधारीत योजनेच्या जाहिरातीबाबत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसवर जाहिराती प्रसिध्द करण्यासाठी शासनाच्या दरकरारावर असलेल्या एजन्सीमार्फत (मे. पृथ्वी असोसिएट्स, मुंबई) यांच्याकडून प्रसिध्दिबाबतची कार्यवाही करण्यात यावी. जाहिरातीच्या तपशिलाबाबत स्वतंत्र आदेश देण्यात येतील.

९. या योजनेखाली येणारा खर्च लेखाशिर्ष "२२०२-सर्वसाधारण शिक्षण -८० सर्वसाधारण, ८०० इतर खर्च, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०६) (०२) -राज्यातील

विद्यार्थ्यांसाठी अपघात विमा योजना (२२०२ ३१०९) ३१ सहाय्यक अनुदाने, मागणी क्र. ई-२," या लेखाशिर्षाखाली चालू वर्षाकरिता उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

१०) हे आदेश नियोजन विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१२९/१४७१ दि.१५-५-२०११ आणि वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ३७९/११ दि.२६-६-२०११ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात करण्यात येत आहेत.

११) सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर शालेय शिक्षण विभागाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०११०७११ ४५७४९०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( ना. उ. रौराळे)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति, मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव

मा. उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव
मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव, विधानमंडळ सचिवालय, मुंबई यांना (पत्राव्दारे)
मा. मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग / सचिव, आदिवासी विकास विभाग / सचिव, कृषी विभाग /सचिव, सामाजिक न्याय व सांस्कृतिक कार्य विभाग / सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग / सचिव, पशुसंवर्धन विभाग / सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
शिक्षण संचालक (प्राथमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे
सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र १/२,मुंबई/नागपूर
आयुक्त, आदिवासी विकास, आदिवासी विकास भवन, आग्रा रोड, नाशिक

आयुक्त, कृषी, कृषी संचालनालय, सेंट्रल बिल्डींग, ३ रा मजला, पुणे
संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय / संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय / संचालक, (प्रशिक्षण), आय.टी.आय., व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, ३, महापालिका मार्ग,मुंबई ४०० ००१
संचालक, कला संचालनालय, कलाशाळा आवार, दादाभाई नौरोजी मार्ग, मुंबई ४०००01
संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, सेंट्रल बिल्डींग, पुणे
संचालक, समाजकल्याण / आयुक्त, अपंग कल्याण/ संचालक, वि.जा.भ.ज., वि.मा.प्र. व इ.मा.व.संचालनालय, ३ चर्च, पुणे - १
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, ४ था मजला, सेंट जॉर्ज हॉस्पिटल कंपांऊंड, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी/ सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा
सर्व शिक्षण निरीक्षक (दक्षिण / उत्तर / पश्चिम), मुंबई
सर्व विभागीय शिक्षण उपसंचालक
सर्व शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) जिल्हा परिषद
सर्व शिक्षणाधिकारी, नगरपरिषदा / नगरपालिका / महानगरपालिका
जनरल मॅनेजर,**नॅशनल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड, मंडल कार्यालय, xiv स्टर्लिंग सिनेमा बिल्डिंग, दुसरा माळा, ६५ मर्झबान मार्ग, मुंबई-४०० ००१**
कार्यासन, (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (प्रसिद्धीसाठी).
निवड नस्ती, कार्यासन, (प्राशि-१), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई

## विवरणपत्र "अ"

### राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत मिळणारे लाभ

| अ.क्र | अपघाताची बाब | सानुग्रह अनुदान |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्याचा अपघाती मृत्यू | रु.७५,०००/- |
| २ | अपघातामुळे कायमचे अपंगत्व ( २ अवयव / दोन डोळे किंवा १ अवयव व १ डोळा निकामी) | रु.५०,०००/- |
| ३ | अपघातामुळे अपंगत्वामध्ये १ अवयव किंवा १ डोळा निकामी | रु. ३०,०००/- |

-----

## विवरणपत्र "ब"

**राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजनेंतर्गत संबंधीत शाळेच्या/ संस्थेच्या मुख्याध्यापक /प्राचार्यांकडे ३ प्रतीत करावयाची कागदपत्रे**

i) पोलीस ठाण्यातील १)प्रथम खबरी अहवाल, २) स्थळ पंचनामा व ३) इन्क्वेस्ट पंचनामा.

ii) जिल्हा शल्य चिकित्सक यांनी प्रती स्वाक्षरी केलेले मयत विद्यार्थ्यांच्या बाबतीत
१) शवविच्छेदन अहवाल,२) मृत्यू दाखला

iii) अपंगत्व अथवा अवयव निकामी होण्याच्या प्रकरणात जिल्हा शल्य चिकित्सक यांनी प्रती स्वाक्षरी केलेले-
१) अपंगात्वचा कारणाबाबतचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिस्वाक्षरीसह कायम अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

## विवरणपत्र क

### दाव्यासाठी करावयाचा अर्जाचा नमुना (अर्जदाराने लिहावा.)

१) अर्जदाराचे नाव (विद्यार्थ्याचे आई /वडील/भाऊ बहीण /पालक)
---------------- ------------------ वय------ -----गाव--------, तालुका-------, जिल्हा -----------विद्यार्थ्यांशी नाते. -----------

२) विद्यार्थ्यांची शाळा /संस्थेचे नाव ------------------------------------------
-------- --------- -----गाव-------------, तालुका ---------------- जिल्हा -----------------

३) विद्यार्थ्यांस अपघात झाल्याचा दि. ------------ , उपचार घेतलेल्या दवाखान्याचे नाव ----------------- दिनांक --------------ते ---------------------
(एक पेक्षा अधिक दवाखान्यात उपचार घेतले असल्यास क्रमवारीनुसार सर्व दवाखान्यांची नावे व कालावधी )

४) दावा करीत असलेले कारण ------------------(अवयव निकामी असल्यास अवयवाचे नाव )---------------

५) दावा सिध्द करण्यास यासोबत लावण्यात आलेली कागदपत्रे
१) उपचाराची कागदपत्रे
२) पोलीस ठाण्यातीला प्रथम खबरी अहवाल.
३) पोलीस स्थळ पंचनामा व इन्स्केस्ट पंचनामा.
४) जिल्हा शल्य चिकित्सक यांनी प्रती स्वाक्षरी केलेले मयत विद्यार्थ्यांच्या बाबतीत १) शवविच्छेदन अहवाल,२) मृत्यू दाखला iii) अपंगत्व अथवा अवयव निकामी होण्याच्या प्रकरणात जिल्हा शल्य चिकित्सक यांनी प्रती स्वाक्षरी केलेले-
१) अपंगात्वचा कारणाबाबतचे डॉक्टरांचे अंतिम प्रमाणपत्र जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिस्वाक्षरीसह कायम अपंगत्वाचे प्रमाणपत्र.

अर्जदाराची स्वाक्षरी

क्ष) मुख्याध्यापक /संस्थेचे प्राचार्य यांचे अभिप्राय व स्वाक्षरी -

य) संबंधीत तहसिलदार यांचे अभिप्राय व स्वाक्षरी